# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल : registrar@sus.ac.in




**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र. पुअहोसोविसो/कु.का./प.व.मू.मं./२०२०/३७५८

दि. २९/०५/२०२०

## -: परिपत्रक :-

### उन्हाळी सत्र परीक्षा २०२० साठी अंतर्गत गुण सादर करण्याबाबत

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ परिसरातील विविध शैक्षणिक संकुलाचे संचालक तसेच सर्व विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, अंतीम वर्ष वगळता इतर सर्व वर्षांचे निकाल लावत असताना ५० टक्के गुण हे अंतर्गत तसेच ५० टक्के गुण मागील परीक्षेमधील प्राप्त सरासरी गुण याचा आधार घेतला जाईल हे आपणा सर्वांना माहित आहेच. प्रस्तुत विद्यापीठाने या बाबत अंतर्गत गुण देण्याच्या पद्धतीबाबत दि. २६ मे, २०२० रोजी परिपत्रक काढले होते.

उपरोक्त दि. २६ मे, २०२० रोजीच्या परिपत्रकामधील मुद्दा क्र. एक मध्ये अंतर्गत गुण देण्याची पद्धती नमूद करण्यात आली होती. परंतु कोव्हीड-१९ चा आपल्या जिल्हयामधील वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, तसेच विद्यार्थ्यांसोबत संपर्क करीत असताना येत असलेल्या अनेकविध अडचणी विचारात घेता, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शनाप्रमाणे परिस्थितीनुरुप सदर परिपत्रकामध्ये या संबंधात काही बदल करणे अपरिहार्य झाले आहे. त्यामुळे अंतर्गत गुण देत असताना आपण पूर्वी ३०, २० अथवा १० पैकी दिलेले जे गुण असतील त्यांचेच रुपांतर ५० टक्के गुणांमध्ये करुन ते खालील तक्त्यामध्ये दि. ३० जून, २०२० पर्यंत विद्यापीठाकडे ई-मेलद्वारे पाठविण्यात यावेत.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पी. आर. एन. क्र. | अंतर्गत गुण | | एकूण द्यावयाचे अंतर्गत गुण (५० टक्के पैकी ) |
|---|---|---|---|---|---|
| | | | ३० पैकी दिलेले गुण | २० पैकी रुपांतरीत केलेले गुण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ =४+५ |
| | | | | | |

मूल्यमापनाच्या ८०:२० आणि ४०:१० या पॅटर्नचे मार्क्स पाठविताना वरील तक्त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन त्याप्रमाणे गुण पाठवावेत. जरी चालू वर्षी आपण ५०:५० टक्के अंतिम गुण देणार असलो तरी आपला परीक्षेचा संगणक प्रोग्राम पूर्वीच्याच पॅटर्न प्रमाणे (७०:३० / ८०:२० / ४०:१०) असल्यामुळे वरीलप्रमाणे गुण पाठविण्यात यावेत.

म्हणजेच आता महाविद्यालयांना विद्यार्थ्याकडून वेगळी असाईमेंट लिहून घेण्याची गरज नाही.

वरील बाब वगळता दि. २६ मे, २०२० च्या परिपत्रकामधील इतर सर्व मुद्दे लागू राहतील.

कळावे.

आदेशावरुन

स्वाक्षरीत/-

**सीए श्रेणिक शाह**

प्रभारी संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव -**

१. मा. कुलगुरु महोदया

२. मा. प्र-कुलगुरु

३. मा. कुलसचिव